“ ज्ञानाची शेती ”

ऑस्ट्रेलिया देशातील फळे व भाजीपाला पुरवठा मूल्य साखळी

कोल्स : एक अग्रगण्य नाव

श्री. अंकुश बरडे, एम.एस.सी. (कृषी)

फळे आणि भाजीपाल्याची मूल्य साखळी म्हणजे शेतावर तयार झालेली फळे आणि भाजीपाला उत्पादने ग्राहकापर्यंत पोहोचवण्याची संपूर्ण प्रक्रिया होय. या साखळीमध्ये उत्पादन, संकलन, प्रक्रिया, साठवण, वाहतूक आणि विक्री या सर्व टप्प्याचा समावेश होतो. ऑस्ट्रेलियामध्ये फळे आणि भाजीपाला उत्पादन प्रामुख्याने क्युन्सलँड, न्यू साउथ वेल्स, विक्टोरिया आणि वेस्टर्न ऑस्ट्रेलिया या राज्यांमध्ये केले जाते. या देशांमध्ये उत्पादनासाठी उच्च दर्जाचे शेती तंत्रज्ञान, सिंचन व्यवस्था व साठवणूक व्यवस्था यांचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो.

या मूल्य साखळीची टप्पे खालील प्रमाणे मांडता येतील



1) उत्पादन (Production) : शेतकरी आधुनिक शेती पद्धती, सिंचन आणि कीड व रोग नियंत्रण करून दर्जेदार उत्पादन घेतात.

2) संकलन आणि वर्गीकरण (Collection and Grading) : उत्पादणे गोळा करून त्यांच्या दर्जा नुसार वर्गीकरण केले जाते.

3) पॅकिंग आणि साठवणूक (Packaging and Storage) : उत्पादन सुरक्षित ठेवण्यासाठी त्याचे व्यवस्थित पॅकिंग करून वातानुकूल साठवून सुविधा वापरून उत्पादने साठवली जातात,यामुळे उत्पादने खराब होऊन वाया जाण्याचे प्रमाण कमी होते .

4) वाहतूक (Transportation) : उत्पादन रेफ्रिजरेटर ट्रक आणि कंटेनर द्वारे देशभर व निर्यातीसाठी पाठवले जाते.

5) वितरण आणि विक्री (Distribution and Retail) : उत्पादन सुपर मार्केट, होलसेल मार्केट आणि स्थानिक विक्रेत्यामार्फत ग्राहकापर्यंत पोहोचवले जाते.



ऑस्ट्रेलियामध्ये फळे आणी भाजीपाला पुरवठा साखळीमध्ये Coles, Woolworths, ALDI, Harris Markets इत्यादी मोठ्या नामांकित कंपण्या महत्त्वाची भूमिका पार पाडतात.या पुरवठा साखळीमध्ये डिजिटल तंत्रज्ञान,ट्रेसिबिलिटी सिस्टीम, शाश्वत शेती पद्धती वापरून ही संपूर्ण साखळी अधिक कार्यक्षम आणि

पारदर्शक बनली आहे. या देशातील फळे व भाजीपालाची मूल्य साखळी ही अत्यंत प्रगत तंत्रज्ञानावर आधारित आणि ग्राहकाभिमुख प्रणाली आहे जी अन्नसुरक्षा, गुणवत्ता आणि शाश्वतता यावर भर देते.

Coles : ऑस्ट्रेलियामधील महत्त्वाच्या आणि सर्वात जास्त व्यवसायाचा वाटा असणाऱ्या कंपनीबाबत आज आपण माहिती घेत आहोत.

ऑस्ट्रेलियामधील फळे आणी भाजीपाला पुरवठा मूल्य साखळी मध्ये कोल्स हा ग्रुप सर्वात जास्त नामांकित असून या व्यवसायात सर्वात जास्त वाटा आहे. Coles ची स्थापना 1914 साली जॉर्ज कोल्स यांनी मेलबर्न मध्ये पहिले स्टोर सुरू करून या कंपनी ची स्थापना केली .या कंपनीचे मुख्यालय हॅवथोर्न ईस्ट व्हिक्टोरिया येथे आहे. कोल्स ग्रुप एका मोठ्या रिटेल नेटवर्कद्वारे काम करतो. यांची ऑस्ट्रेलियामध्ये 1800 ऊन अधिक रिटेल आउटलेट आहेत,त्यासोबत एक लाख 15 हजार हून अधिक कामगार त्यांच्याशी जोडलेले आहेत.कोल्स यांचे 8000 पेक्षा अधिक पुरवठादार आहेत.यांचा व्यवसाय फक्त दुकानातच नाही तर ऑनलाईन माध्यमाद्वारे **" क्लिक अँड कलेक्ट, होम डिलिव्हरी "** द्वारे सुद्धा चालतो.



❖ **कोल्स ग्रुप मध्ये काही प्रमुख ब्रँड पुढील प्रमाणे आहेत**

1) **कोल्स सुपर मार्केट :**

यामध्ये मुख्यत: किराणा व ताज्या उत्पादनाची विक्री केली जाते. कोल्स आपल्या " नॅशनल डिस्ट्रीब्यूशन सेंटर " व " फ्रेश प्रोडूस हब " द्वारे शेतकऱ्याकडून थेट उत्पादनाची खरेदी करते.

2) **कोल्स लोकल :**

स्थानिक समुदायासाठी लहान आकाराच्या सुपर मार्केट द्वारे स्थानिकासाठी उच्च दर्जाचे व प्रीमियम प्रोडक्ट याद्वारे वितरित केले जातात.

3) **लिकरलँड,फर्स्ट चॉईस, लिकर मार्केट,विंटेज सेलर्स :** ब्रँडद्वारे मद्यविक्री केली जाते.

4) **ऑनलाइन सेवा व पुरवठा (Business and Supplies) :** याद्वारे वेगवेगळ्या सेवा व उत्पादनाचा पुरवठा केला जातो.

❖ **कोल्स ग्रुपच्या संस्कृतीमध्ये 4 Cs नावाने ओळखली जाणारी चार मूल्य आहेत ती पुढीलप्रमाणे आहेत.**

- ✓ **Care :** यामध्ये एकमेकाची काळजी घेतली जाते.
- ✓ **Courage :** त्यामध्ये योग्य तो निर्णय घेण्याचे धैर्य दाखवले जाते.
- ✓ **Deliver for our Customers :** ग्राहकासाठी उत्कृष्ट सेवा देण्यासाठी कटिबद्धता.
- ✓ **Create for the future :** भविष्यासाठीची तरतूद करणे.

ही मूल्ये कंपनीच्या कर्मचारी,पुरवठादार व ग्राहक यांच्याशी व्यवहार करताना मार्गदर्शक म्हणून काम करतात.

❖ **कोल्स ग्रुपने काही महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घेतलेले आहेत**

- ✓ ऑस्ट्रेलियामध्ये जास्तीत जास्त उत्पादने "ऑस्ट्रेलियन मेड " चा सहभाग वाढवण्याचे धोरण.
- ✓ ई कॉमर्स तथा ऑनलाइन विक्री वाढवणे व त्यासाठी लॉजिस्टिक व पुरवठा साखळीचे आधुनिकीकरण करणे.
- ✓ पर्यावरण रक्षण आणि सामाजिक दायित्व व शाश्वततेच्या दृष्टिकोनातून पुढाकार कंपनीची उद्देश साध्य करण्यासाठी
- ✓ **" ऑस्ट्रेलियन इट आणि लिव्ह बेटर एव्हरी डे "** यावर भर दिला जातो.

❖ **सामाजिक व पर्यावरणात्मक जबाबदारी**

कोर्स ग्रुप सामाजिक कार्यात नेहमीच सहभागी होत असते. कंपनी विविध सामाजिक कार्यक्रम चालवते व विविध पायाभूत सुविधा तयार करते जिथे स्थानिक पुरवठादार व समाजाचा सहभाग असतो त्या जोडीने कामगारांसाठी सर्वसमावेशक संस्कृती तयार करण्यावर विशेष भर देते

" सेकंड बाईट " आणि " फूड बँक ऑस्ट्रेलिया " याद्वारे अन्नदान व अन्न वाया जाऊ नये याबाबत कोल्स काम करते.



❖ **आव्हाने आणि विरोध**

कोल्स ग्रुप सारख्या मोठ्या रिटेलला देखील काही आव्हाने येत आहेत ती पुढीलप्रमाणे आहेत.

1)स्पर्धात्मक बाजारपेठ आणि किमतीवरिल दबाव.

2)ऑनलाइन भावना वाढत असल्यामुळे पुरवठा व लॉजिस्टिक व्यवस्थापन आणखी कठीण होत आहे.

3) ग्राहकांचा पुरवठादारावरिल दबाव व उत्पादनाचा दर्जा कमी होण्याबद्दल टीका केली आहे.

4) ALDI या जर्मन ब्रँडची डुप्लिकेट कॉपी असे संबोधले जाते.

❖ **शेवटी**

कोल्स ग्रुप फळे आणि भाजीपाला मूल्य साखळी मध्ये शतकभरापेक्षा जास्त कालावधीपासून लहान दुकानापासून सुरुवात करून आज एक मोठ्या सुपर मार्केट आणि संपूर्ण रिटेल प्रणालीमध्ये कार्यरत आहे.त्यांची मूल्य,उद्देश,आणि धोरणे या सर्व गोष्टी **" ग्राहकासाठी उत्तम सेवा "** यावर केंद्रित आहेत.

ऑस्ट्रेलियातील किराणा विक्रीच्या बाजारात कोल्स प्रमुख खेळाडू आहे तो आपल्या सेवा,नेटवर्क,ग्राहक आधार व नावीन्यपूर्ण उपक्रमामुळे स्वतःचे स्थान निर्माण केले आहे त्यामुळे कंपनीला भविष्यात व्यवसाय वाढीस मदत होणार आहे.

भारतिय दृष्टिकोनातून पाहता " **कोल्स** "सारख्या कंपनीचा अभ्यास मार्केटिंग, पुरवठा साखळी व्यवस्थापन, ग्राहक वाढ आणि सीएसआर बाबतीत उपयुक्त आहे.



ज्ञानाची शेती
फायद्याची व आरोग्यदायी..!